

श्री सतपंथ शिक्षण संस्कार माला

(भाग २)

अंतरंग


- आचार-संहिता
- अष्टांगयोग
- देव-देवतांचे ध्याने
- देव-देवतांचे मंत्र
- देव-देवतांचे स्तोत्र
- संसारात येणाऱ्या अनेकानेक अडचणींवरील उत्कृष्ठ उपाय



-० प्रकाशक ०-

आचार्य श्री जनार्दन महाराज

सतपंथ साहित्य प्रकाशन, फैजपूर



श्री सत्पंथ शिक्षण संस्कार माला

(भाग २)

अंतरंग

- आचार-संहिता
- अष्टांगयोग
- देव-देवतांचे ध्याने
- देव-देवतांचे मंत्र
- देव-देवतांचे स्तोत्र
- संसारात येणाऱ्या अनेकानेक अडचणींवरील उत्कृष्ठ उपाय



-० प्रकाशक ०-

आचार्य श्री जनार्दन महाराज

सत्पंथ साहित्य प्रकाशन, फैजपूर

अनुक्रमणिका



मनुष्याने पालन करण्याच्या काही आचार-संहिता

१) समाजातील प्रत्येक व्यक्तिने आईबाप, बालबालिका, तरूण व प्रौढ व्यक्तिने सकाळ संध्याकाळी मंदीरात होत असलेल्या आरती करिता हजर रहावे. मंदीरात उदधूप फिरवून वातावरण स्वच्छ व पवित्र केले जाते. भगवान निष्कलंकी नारायणाच्या आसनाची आरती केली जाते. सर्वदेवऋषीवरांचा नमस्कार करावा. सर्वांना व्यक्तिगत नमस्कार करावा. नंतर आपापल्या आसनावर बसून गुरुमंत्रांचे स्मरण रटन करीत करीत डोळे मिटून मन एकाग्र अंतर्मुख करावे.

२) मंदीरात सेवा आरती, पूजेच्या वेळी ध्यानस्थ बसलेल्या व्यक्तीचे ध्यान भंग करू नये, कित्त्येक मंदीरात आरती, पूजकरीता घंटे लावलेले असतात. घंटे, झांज, पेटी, तबला वाजवून कित्त्येक लोक ध्यान भंग करतात. ते योग्य नाही. त्यायोगे ध्यानस्थ व्यक्तीचे मन अस्थिर होते.

३) देवमंदीर हे जीवनशक्ति प्राप्त करवून देणारे उर्जाघर आहे. असे समजून प्रत्येक मनुष्य स्त्री-पुरुष, मुलं मंदीरात येऊन आरती पूजा सेवेत हजर राहतील असे भावमय वातावरण वडिलधाऱ्यांनी गावात उभे करावे. कमीत कमी तेवढ्या वेळेपुरता टी. व्ही. सारखे मनोरंजक कार्यक्रम बंद ठेवावे.

४) दररोज सकाळ, संध्याकाळ मंदीरात गुरुचरणामृत तयार करून गुरुमंत्रांचे स्मरण करीत प्राशन करावे. सकाळी देवदर्शनास जाण्याच्या आधी स्नान करून जावे. संध्याकाळी शक्य असल्यास स्नान करावे किंवा हात-पाय, तोंड धुवावे, स्वच्छ पवित्र वस्त्र नेसावे. डोक्यावर टोपी, खांद्यावर छाटी (उपरणे) व हातात जपमाळ असणे आवश्यक आहे. शाळेत अथवा

न्याय मंदीरात गणवेशात जाणे जरूरीचे असते, त्यापेक्षाही देवमंदीरात आपण कपड्यांची विशेष काळजी घ्यावी. पुरुष मुलें यांनी सदरा, टोपी, उपरणे, पायजमा अथवा धोतर नेसून यावे. स्त्रीयांनी शक्यतो भडक कपडे न वापरता पूजेस पांढरी साडी, ब्लाऊज, घालावे. ही देव मंदीरात जाण्याची आठवण करून देणारी साधने आहेत. त्यायोगे मन प्रसन्न व शांत, स्थिर राहते. चित्रविचित्र पोषाखाने मन चंचल व अस्थिर होते. मनाच्या एकाग्रतेकरितां स्वच्छ धुतलेले पांढरे कपडे परिधान करावे.

५) या विश्वातील मानवी जीवन हे गणिताच्या नियमावर चाललेले असते. कालचक्राच्या गणनेनुसार प्रत्येक मानवाचे जीवन घडत असते व योग्य समय येताच नष्ट होत असते. मध्यंतरीच्या काळात त्यावर जे संस्कार सिंचन केले जाते. त्यावर मानवाची प्रगति वा अधोगति होत असते. सुसंस्काराच्या योगाने त्याला शारीरिक सौख्य, शांति मिळेलच असे नाही. पण मानसिक व आत्मिक शांति मात्र अवश्य मिळते. याच्या उलट कुसंस्काराच्या योगाने शारीरिकही, मानसिकही व आत्मिकशांति सुध्दा मिळणे दुरापास्त आहे. म्हणून मनुष्याने आपण नितीमत्तेच्या अथवा अनियमिततेच्या चाकोरीने जीवन कंठायचे हे ज्याचे त्यानेच ठरवायचे असते. कित्येक नरपशूंना तर एवढ्या पुरते सुध्दां ज्ञान नसते.

६) प्राचिन काळी ऋषिवर मुनिवरांनी या नीतिमुल्यांचा सांगोपांग अभ्यास केलेला आहे. निरनिराळ्या देवीदेवतांची स्मरणे, ध्याने, उपासना, फलश्रुति यांचा सुध्दा अभ्यास करून आपल्याला वैदिक, पौराणिक, तांत्रिक, देवतांच्या उपासना शिकविल्या आहेत. त्यांचा अभ्यास आपण जागृत ठेवण्याचा प्रयत्न करायला हवा आहे. हल्लीच्या शैक्षणिक काळात मनुष्य

कितीही मोठा ऑफिसर असला तरी तो गुलामगिरीत राहतो. पण त्याने देशाचे कार्य आहे या भावनेतून कार्य केले तर त्याला जे आत्मिक समाधान लाभते ते फार वेगळे असते. याकरीतां शील संवर्धन करणे फार महत्त्वाचे आहे. शीलसंवर्धन हेच खरे सुशिक्षण आहे.

७) ब्रह्म हे अज आहे. आकाश–अवकाश–पोकळी हे विश्वव्यापक तत्त्व आहे. पण ते ब्रह्म नव्हे. ब्रह्म तत्त्व हे त्याही पलिकडचे आहे. सर्वव्यापक ज्योतिर्मय चैतन्य स्वरूप ब्रह्म तत्वज्ञानाने जाणता येतो. 'सह नाववतु सह नौ भुनक्तु व तेजस्वीनावधीतमस्तु! मा विद्विषावहै।।' 'सर्वे सुखिन: सन्तु' हे आर्यऋषींचे जीवन होते. त्यांच्या जीवनात संपूर्ण विज्ञानवाद भरलेला आहे.' 'त्यक्तेन भुंजीथा:' प्रथम द्या व मगच खा. यात विश्वशांतीची बीजे आहेत. प्रातर व सायसंध्याविधीने कुलपरंपरा टिकविता येते यासाठी थोडा वेळ तरी स्वस्थ बसण्याचा रोज अभ्यास करावा.

८) वर्णशुध्दि, जातिशुध्दी, कुलशुध्दि ह्या गोष्टी स्त्रियांच्याच स्वाधीन आहेत. स्त्रियांची स्थिती शारीरिक व मानसिक ह्यावर समाजस्थितीचा निकष असतो मेधा व प्रज्ञा ह्या स्त्रियांच्या ठायी उपजतच असतात. गुलाबपुष्पाचे गुलाबत्व रक्षण करण्यासाठी जसे त्याच्या भोवती काटे असतात, तसेच स्त्रियावरील निर्बन्ध हे त्यांच्या स्त्रित्याचे रक्षण करण्याकरितांच असतात ते त्यांना गुलामगिरीत ठेवण्यासाठी नसतात. परंतु हे निर्बन्ध त्यांना पाळावेच लागतात.

९) स्त्रियांतील गुप्त व सुप्त दैवी तेज प्रकट होण्यासाठी लग्न हा उत्तम उपाय आहे. स्त्री, पत्नी यांचेच नाव गृह, पण ही गृहस्थिती ज्यांची बिघडलेली आहे. त्यामागे नेहमीच घरघर असते. त्यासमाजात अराजकता पसरते. घरामध्ये स्त्रीपत्नि

ही कामविकार जिंकण्यासाठीच असते, तर मुले, ही क्रोध लोभादि विकार जिंकण्यासाठीच असतात. मुलांना केवळ विद्यावान करण्यापेक्षा गुणवान करणे हे मातेचे व पित्याचे ध्येय असावे. विद्यासंपन्न मूल गुणसंपन्न होऊच शकेल असे नाही. मुलाला जास्तीत जास्त गुणवान करणे. मातापित्यांचे कर्तव्य आहे. 'गृहिणी सचिवः सखी मिथः प्रिय शिष्या ललिते कलाविधौ.' ही भारतीय स्त्रीत्वाची मांडणी आहे.

१०) आपल्या वंशात सुप्रजा निर्माण व्हावी हाच विवाहबध्द होण्याचा मुख्य हेतू आहे. पातिव्रत्य रक्षण हेच भारतीय नारींचे मुकुटमणि वैशिष्ठ्य आहे. 'पतिव्रता नस्यात केवलं योनिरक्षणात्' हा विचार मनात बाळगून भगिनींनी आपले घर आदर्श ठेवावे. आपली मुले गुणसंपन्न आदर्श ठेवावे. स्वतः स्त्रियांनी आपले आरोग्य चांगले ठेवण्याचा प्रयत्न करावा. स्वयंपाकगृह, स्नानगृह, बागबगीच्या ह्यातील कामाइतका स्त्रीच्या आरोग्यासाठी दुसरा श्रेष्ठ व्यायाम व उपाय नाही.

आचार्य श्री जनार्दन महाराज
श्री सतपंथ मंदीर संस्थान, फैजपूर

गुरुपौर्णिमा
प्रथम आवृत्ती
९/७/१९९८

पुण्यतिथी महोत्सव
द्वितीय आवृत्ती
१४/१२/२०१०

ॐ

।। श्रीमत्सदगुरवे नमः ।।

।। श्री निष्कलंकी नारायण विजयतेतराम् ।।


ॐ नमो निष्कलंकी नारायण जनार्दनाय ।
भस्मायुधाय विद्महे दिव्यनेत्राय धीमहि ।।
तन्नोज्वहरः प्रचोदयात् ।
ॐ शांतीः ! शांतीः !! शांतीः !!!

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुदर्वेवो महेश्वरः।
गुरु साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः।।

ॐ काराष्टक !

ॐ हे एकाक्षरी ब्रह्म आद्य पूज्य स्वयंप्रभ।।
साकार नि निराकार दोन्ही एकचि त्या नति।।१।।
ॐ ध्याने मने श्रवणे कीर्तने वा जपादिके।।
ॐ परायणभक्तांसी ब्रह्मानुभव पूर्णची।।२।।
ॐ ब्रह्मस्मरणानेचि ब्रह्मज्ञान हृदि स्फुरे।।
तयाने मोक्षसंसिध्दि तयाने अमृतत्त्वही।।३।।
अखण्डतैलधारावत् दीर्घ घण्टानिनादवत्।।
दीर्घ प्रणव उच्चारी गंभीर शंखनादवत्।।४।।

दिव्य ॐ कार ध्यानाने मन स्वाधीन होतसे।।
ध्यानानेच समाधी ही एकान्तप्रिय सज्जना।।५।।
स्थापावी दृष्टि नासाग्री ईन्द्रिये सर्व रोधुनी।।
करून मन एकाग्र करी ॐ ब्रह्म चिंतन।।६।।
ॐ कारचि परब्रह्म ॐ कारचि महान गुरु।।
ॐ कार परमात्माचि आत्मोत्कार अनन्यही।।७।।
ॐ ब्रह्मध्यानयोगाने विष्णु विष्णुत्व पावला।।
ब्रह्मत्व पावला ब्रह्मा शिवत्व शिव लाभला।।८।।
ॐ कार अष्टका नित्य पठे जो दृढभक्तिने।।
शक्ति भक्ति तथा मुक्ति लाभती त्या न संशय।।९।।
सर्वे ऽ पि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु न कश्चिददुःखमाप्नुयात्।।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः !!!



ध्यान म्हणजे काय?

ध्यान म्हणजे एकरूप होणे, अध्यात्मिक दृष्टीने विचार करता ध्यानाचा अर्थ आनंदप्राप्तीसाठी इंद्रिये, मन, बुध्दी जेव्हा एखाद्या विषयाशी एकरूप होतात त्या एकरूपतेलाच ध्यान म्हणतात, या एकरूतेचे जे विषय आहेत त्यावरून ध्यानाचे प्रकार पुढील प्रमाणे होत.

१) इन्द्रियात्मक ध्यान :-

ह्यालाच तामस ध्यान म्हणतात. आपल्या विविध इंद्रियांच्या विविध वासना (विकार) असतात. त्या वासनांच्या पासून मिळणाऱ्या आनंदासाठी जेव्हा इंद्रिये, मन व बुध्दी समरस होऊन विषय पुर्तीसाठी प्रयत्नशील होतात व स्थिती म्हणजेच इंद्रियात्मक ध्यान होय.

२) देहात्मक ध्यान :-

इंद्रियापेक्षा देह वेगळा आहे. त्याच्या आनंदाने विषयही वेगळे आहेत. तहान, भूक, झोप, थंडी, ऊन, वारा हे देह प्रकृतीचे विषय होत. याचे निवारण करण्याकरितां सर्वांनाच मनबुध्दि इंद्रियाकडून प्रयत्न करावा लागतो. यालाच देहात्मक ध्यान म्हणतात. हे राजस वृत्तीचे ध्यान होय.

३) आध्यात्मिक ध्यान :-

मनाचे तमो - रजोगुण वृत्तिरहित होऊन सात्विक विचारांच्या साह्याने मनाने आत्म्याशी एकरूप होण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे आध्यात्मिक ध्यान होय.

वरील तीनही प्रकारचे ध्यान हे देहाशी संबंधित आहे. परंतु याच्याही पुढे जाता येते. त्याला विदेही अवस्था म्हणतात. आत्मा हा परमात्म्याच्या जाणीवेच्या अवस्थेत भाव समाधीत असतो. यालाच परमहंस स्थिती म्हणतात. रामकृष्ण परमहंस, नित्यानंद महाराज, चैतन्य महाप्रभू यांसारखे सत्पुरुष विदेही अवस्थेच्या परमानंदात डोलत होते. याच्याही पुढे जे संत परमात्म्याशी एकरूप झालेत ती अवस्था म्हणजे निर्गुण-निराकार पारमार्थिक ध्यान होय. यालाच जीवाची सायुज्यमुक्ति असे म्हणतात. हीच निर्विकल्प समाधी होय.

ध्यान करणाऱ्या साधकांला यम-नियमांची माहिती असणे आवश्यक आहे. कारण यमनियमानुसार वर्तन केल्याशिवाय ध्यानाच्या पायरी पर्यंत पोहोचता येत नाही. म्हणून साधकाने यम नियमांची माहिती करून घेऊन आचरण करावे. यम-नियमांची प्रत्येकी पाच अंगे आहेत.

यम - याची पाच अंगे

१) अहिंसा, २) सत्य, ३) अस्तेय, ४) ब्रह्मचर्य, ५) अपरिग्रह

१) अहिंसा :-

सर्व प्राण्यावर दयाभाव ठेवणे, कोणत्याही प्राण्याचा प्राण न घेणे, शब्दाने वा कृतीने इतरांना दुःख न देता शक्यतो सुख देणे यालाच अहिंसा म्हणतात. ज्यांना आपल्या स्वरूपाची जाणीव करून घेऊन परमानंद अवस्थेत परमपदास जावे अशी इच्छा असेल त्यांनी अहिंसा धर्म स्विकारलाच पाहिजे.

२) सत्य :-

सत्यव्रताचे पालन करणाऱ्या व्यक्तिने बोलतो त्याप्रमाणे आचरण ठेवावे. आपले बोलणे दुसऱ्यास गोड वाटेल असे बोलावे. आपले सहज बोलणे दुसऱ्याला उपकारक ठरावे. त्या बोलण्याने ऐकणाऱ्याचे कल्याण व्हावे. सत्य तेच बोलावे, कारण असत्य बोलण्याने स्वतःची व दुसऱ्याचीही हानी होते. त्यातील सर्वात मोठी हानी म्हणजे आपण सत्यप्रिय परमेश्वरापासून दूर जातो आणि असत्यप्रिय राक्षसांचे मित्र होतो. व्यर्थ आणि निष्फळ बडबड सत्यव्रतीने टाळलीच पाहिजे.

३) अस्तेय :-

दुसऱ्यांची कोणतीही वस्तू वा पैसा कष्ट केल्याविना आपण घेऊ नये. अशा प्रकारचा मोह मनातही आणू नये. रस्त्यात एखादी वस्तू मिळाली तर ती त्याची त्याला परत करावी. समजा, प्रयत्न केल्यानंतर ही त्या वस्तूचा मालक आपणास मिळाला नाही, तर ती वस्तू एखाद्या सत्पात्र व्यक्तिला दान द्यावी पण स्वत: तिचा वापर करू नये. मनांत ज्या ज्या गोष्टीमुळे वासना बळावतील अशा गोष्टींचा जाणीवपूर्वक त्याग करावा.

४) ब्रह्मचर्य :-

कामविकार हा साधकाचा सर्वात मोठा शत्रू आहे. कलियुगातले त्याचे थैमान वादळासारखे वाढतच चालले आहे. घाणेरडी पुस्तके, मासिके, त्यातील अश्लील व बिभत्स मजकूर व चित्रे, सिनेमा, टी. व्ही. नाटके आणि स्त्रियांच्या देह प्रदर्शन करणाऱ्या फॅशन्स यातून कामप्रक्षोभ वाढतो आहे. साधकाने ह्या सर्व गोष्टींचा आणि ठिकाणांचा त्याग करावा. धर्मग्रंथ आणि संतचरित्रांचे वाचन करावे. सत्संग व सत्‌विचार करीत असतां सदैव सत्कार्यात दंग असावे. कार्य मग्न मनात कामविकारांना थारा मिळत नाही. सात्विक व मिताहाराने कामप्रवृत्ति योग्य राहते. जिभेला आवडणाऱ्या पदार्थावर व जिभेवर संयम ठेवला तरच ब्रह्मचर्य रक्षणाचा पाया घातला जातो.

कायेन मनसा वाचा सर्वाऽवस्थासु सर्वदा ।।
सर्वत्र मैथुन त्यागो ब्रह्मचर्य प्रचक्षते ।। (श्रीयाज्ञवल्क्य.)

५) अपरिग्रह :-

प्रपंच आणि परमार्थ ह्या दोहोतही जरूरीपेक्षा अधिक वस्तूंचा संचय न करणे म्हणजे अपरिग्रह होय. मोहामुळे संचयाची वृत्ति बळावते. पदार्थविषयींच्या प्रीतीतून भीतीचा जन्म होतो. ती वस्तू सांभाळायची कशी या विचारांनी आपण वेढतो आणि मग शारीरिक व मानसिक बळाची खच्ची सुरु होते. म्हणून परिग्रहप्रमाणाचा निश्चय प्रथमपासूनच आचार विचारात असावा. जो या निश्चयाने वागतो तो संचयाची आस धरत नाही. म्हणूनच अशा साधकाला भय स्पर्श करू शकत नाही. परिग्रहाने अंती प्राप्त होते ते प्रापंचीक दुःख आणि अपरिग्रहाने लाभतो अनंताच असिम आनंद. म्हणून साधकाला अपरिग्रह आवश्यक आहे. उदा. नदीचे सर्व पाणी आटले तर दुष्काळ अटळ ठरतो, तसेच महापूर आला तर तोही शेतीचा, बागाचा व गांवाचा नाशच करतो. तेच नदीचे पात्र भरून पाणी सतत वाहात असेल तर सर्वांचाच उत्कर्ष होईल. म्हणून देहधारणे इतकी व संसार साधण्याइतकी आसक्ति असावी. हे जाणून वस्तूंचा संचय करणे म्हणजेच अपरिग्रह होय.

नियम - हेंही पाच आहेत.

१) शौच, २) संतोष, ३) तप, ४) स्वाध्याय, ५) ईश्वरप्रणिधान.

१) शौच :-

शौच म्हणजे शुध्दी. ही शुध्दी दोन प्रकारची असते. एक बाह्य शुध्दी व दुसरी आंतरीक शुध्दता.

बाह्यशुध्दी :- शरीराला पाणी, माती, शिकेकाई, साबण इ. च्या साह्याने प्रथम स्वच्छ धूवुन पुसून घ्यावे. त्यानंतर १) धौति, २) बस्ती, ३) नेती, ४) त्राटक, ५) नौली, ६) कपालभाती या षड्कर्माच्या आधारे कफ, पित्त, वात मलादिकांच्या दृष्टीने शरीर आतून स्वच्छ असावे.

अंत:शुध्दी :- सुखासन, पद्मासन, सिध्दासन, या वज्रासन यापैकी अनुकुल वाटेल त्या आसनात बसून घ्यावे. डोळे झाकून घ्यावेत आणि ज्ञानाने मनातील दोष काढून टाकावेत. ही अंत:शुध्दी होय.

२) संतोष :-

तृष्णेतून सर्व दु:खाचा उगम होतो तर संतोषातून दु:खाचा विलय व सुखाचा उगम होतो. कष्ट व भक्तिसहित आणि व्यसन व तृष्णारहित जी संपत्ती लाभते ते संतोषधन होय. कष्टान्न हे मिष्टान्न असते, तर कष्टाविना अन्न हे उष्टे अन्न

असते. श्रध्दा व प्रयत्नपूर्वक प्रपंच करावा त्यातून आनंद व शांतीरूपी लोणी निघेल. त्याचेच संतोष हे तूप होईल. ते जर प्रपंचरूपी स्वयंपाकात वापरले तर स्वयंपाक स्वादिष्ट होणारच.

३) तप :-

शरीर व मनाने विषयांचा त्याग करून थंडी, ऊन, पाऊस सहन करून शरीराला कष्ट देत ते कृश करणे ह्यालाच तप म्हणतात. तर मनाने केलेल्या विषयांच्या त्यागाला जप म्हणतात. जपाने आत्मबल वाढविण्यास वेळ लागतो. तपाने आत्मबलाची वाढ झपाट्याने होते. जपात मृदुता आहे. तर तपात कडकपणा आहे. जप अर्थात राजयोग तर तप म्हणजेच हठयोग होय.

राजयोग :-

राजयोगाचा मार्ग म्हणजे मांजर आणि मांजराच्या पिल्लाप्रमाणे आहे. पिल्लाला आपली आई कोठे आहे हे माहित नसते. मांजराने ठेवलेल्या जागी फक्त म्यांव म्यांव करीत राहणे हे पिल्लाचे काम असते. मांजराला मात्र आपले पिल्लु कोठे आहे हे माहित असते. त्या जागेवर पिल्लाला जर त्रास होऊ लागलातर मांजर पिल्लाला दाताने पकडून सुरक्षित ठिकाणी घेऊन जाते. पिल्लाला ती इतके अलगद पकडते की तिच्या दाताची त्याला कोणतीही इजा होत नाही. याप्रमाणे राजयोग आहे. या मार्गातील भक्त अंत:करणपूर्वक फक्त नामस्मरण करीत असतो. देव कोठे आहे हे त्याला माहित नसते. संकटकाळी तो परमेश्वराची आळवणी करतो. अश्रु गळत असतांना देखील त्याचे नामस्मरण सुरु असते. अंत:करणाने

तो भगवंताच्या अगदी जवळ येऊन पोहोचतो. अशाप्रसंगी भगवंत भक्ताचा पाठीराखा असतो.

हठयोग :-

हठयोगाचा मार्ग म्हणजे वानर व वानरारच्या पिलाप्रमाणे आहे. वानराचे पिल्लू वानराच्या कमरेला पकडून पोटास बिलगते. वान मात्र त्याला पकडत नाही. फक्त कधीतरी पिलाच्या पाठीवर हात फिरविते व खाऊ देते. वानर एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उड्या मारीत असते. अशावेळी पिलाची दृष्टीची जर आंब्यासारख्या एखाद्या सुंदर फळावर गेली आणि ते फळ मिळविण्याच्या मोहाने त्याचा हात तिकडे वळला तर ते वानरापासून निसटून खाली पडते. याप्रमाणे हठयोगी असतो. हठयोगी हा तपश्चर्येच्या बळावर अहंकाराने भगवंताला पकडतो आणि जर तो एखाद्या मोहाला बळी पडला तर भ्रष्ट होतो. तोच भ्रष्टयोगी होय.

म्हणून राजयोगामध्ये जप आहे तर हठयोगामध्ये तप आहे. तपाचे कायिक, वाचिक व मानसिक असे तीन भेद आहेत. तसेच त्याच्यातील वृत्तीवरून सात्विक राजस व तामस असेही तीन भेद केले जातात.

अ) सात्विक तप - म्हणजे कर्मक्षय करणारे इच्छारहित तप होय.

ब) राजस तप - धन, मान, इ. च्या फलांची अपेक्षा धरून केलेले तप.

क) **तामस तप** – दुसऱ्यांचा नाश व्हावा, तो पाहावा. ऐकावा यासाठी अघोरिपणे केलेले तप हे तामसी तप होय.

४) स्वाध्याय :–

'स्व' म्हणजे आत्मा तो समजण्याकरीता ज्या ग्रंथात जो मार्ग सांगितला तो पठण करणे म्हणजे स्वाध्याय होय. साधकांची सारी इंद्रिये ध्यानापूर्वी आपापल्या परीने गोंगाट–गोंधळ करीत असतात पण साधक जेव्हा वैखरीने ॐ चा उच्चार करतो. तेव्हा त्याचे शरीर व मन आपोआपच शांत होते. अशावेळी ॐ माध्यमाने म्हणावा म्हणजे आत्म्याशी संबंध साधता येतो. इथून पुढे श्वासाशी संबंध येतो. एका अर्थाने स्व ची आंस म्हणजेच श्वास. स्व म्हणजे आत्म्याचा या देहातच शोध घ्यावयाचा. त्या शोधासाठी भगवंताने प्रत्येकाला जन्मतःच एक मार्ग दिला आहे. तो म्हणजे श्वास. त्यालाच ग्रंथातून सोऽहं मार्ग म्हणून संबोधले जाते. श्वासाच्या गतीबरोबर मनातल्या मनात ॐ म्हणत जावे म्हणजे शांत झालेले मन व बुध्दी आत्म्यापर्यंत पोहोचू शकतात. ह्यालाच स्वाध्याय म्हणतात.

५) ईश्वरप्रणिधान :–

परमेश्वराचे महात्म्य व सामर्थ्य पूर्णार्थाने जाणणे व त्याच्या विषयी सदैव प्रेम असणे हे भक्तीचे सार आहे. परमेश्वराची नवविधा भक्ती करावी. आपल्या प्रत्येक व्यवहाराला तो साक्षी आहे. याची जाणीव ठेवावी. आपला प्रपंच आणि

परमार्थ केवळ परमेश्वराच्या इच्छेवरच अवलंबून आहे. ह्याचे स्मरण ठेवावे. देह–मन–बुध्दीची गति ही त्या भगवंताची गती आहे. असा पूर्ण विश्वास ठेवावा. यालाच ईश्वरप्रणिधान असे म्हणतात.

साधकाने वरील यम–नियमांचे पालन करीत ध्यान साधनेस सज्ज व्हावे.

प्राणायाम :–

प्राणायाम म्हणजे प्राणावर आयाम अर्थात ताबा मिळविणे होय. ध्यानासाठी प्राणायाम आवश्यक आहे. काही लोक कुंडलिनीशक्ती जागृत करण्याकरीता प्राणायाम करतात. यासाठी प्राणायाम करण्याच्या पध्दती काही अवघड व धोक्याच्याही आहेत. तज्ञांच्या मार्गदर्शनाशिवाय या प्रकारचा प्राणायाम करू नये. ध्यानासाठी प्राणायाम कसा करावा! या प्रश्नांचे उत्तर पुढीलप्रमाणे – ध्यानासाठी शरीर निरोगी पाहिजे. निरोगी शरीर सतत स्वच्छ ठेवावे लागते. या स्वच्छतेसाठी श्वासाच्या सोप्या पध्दतीचा अवलंब करावा. या पध्दतीपैकी दीर्घश्वसनाचा सराव प्रारंभी करावा. आपले श्वसन सदैव सुरुच असते.

नेहमीच श्वसन हे ऱ्हस्व असते, श्वास फुफ्फुसात सावकाश पूर्ण भरणे व सावकाश पूर्ण सोडणे म्हणजे दीर्घ श्वसन होय. मोकळ्या जागेत शांतपणे बसावे. तोंड बंद करून नाकाने सावकाशपणे भरपूर श्वास घ्यावा आणि तितक्याच सावकाशपणे तो नाकाने सोडावा असे वीस–पंचवीस वेळा करावे. यामुळे फुफ्फुसे आकुंचन प्रसरण पावतील. त्यामुळे

श्वास घेण्याची शक्ती वाढेल. फुफ्फुसातील दोष नाहीसे होतील. कोणत्याही प्रकारचा प्राणायाम करण्याची ही पूर्व तयारी होय. दीर्घ श्वसनाने श्वासावर ताबा मिळविता येतो. पुढे त्याचमुळे मन स्थिर होण्यास म्हणजेच ध्यानाला त्याचा उपयोग होतो.

दीर्घश्वास प्रारंभी पंचवीस वेळा करीत रहावे. नंतर ही संख्या हळू हळू वाढवित पन्नासपर्यंत न्यावी. नंतर आपल्या या दीर्घश्वसनाच्या वेळेवर लक्ष अधिक केन्द्रित करावे. म्हणजे असे की, आपण श्वास जितक्या वेळात घेतो. तितक्याच वेळात तो सुटतो का ते पहावे. प्रारंभ हे लक्षात येण्यासाठी घड्याळ्याचा वापर करावा. ही क्रिया जमू लागल्यानंतर श्वास घेण्याच्या वेळेपेक्षा श्वास सोडण्याची वेळ वाढवित रहावे म्हणजे असे की, समजा आपण पाच सेकंदात श्वास घेत असू तर सोडतांना तो सहा वा सात सेकंदात सावकाशपणे सोडावा. याप्रकारे प्रयत्न करीत अखेरीस पाच सेकंदापर्यंत श्वास घेणे व दहा सेकंदापर्यंत श्वास सोडणे अशा प्रकारचे दीर्घश्वसन आपणाला जमावे.

श्वास आत घेण्याच्या क्रियेला पूरक म्हणतात. श्वास बाहेर सोडण्यांच्या क्रियेला रेचक म्हणतात. पूरक पाच सेकंद व रेचक दहा सेकंद अशा प्रकारचे दीर्घश्वसन आपणाला जमू लागले की पूरक-रेचकाचेच प्रमाण एकास दोन झाले असे समजावे. आपले श्वसन एकदा एकास दोन याप्रकारे होऊ लागले की श्वासाची आणि मनाची स्थिरता कशी आहे ती

समजून घ्यावी. त्यानंतर प्राणायामात पुढीलप्रमाणे प्रगति करीत राहावे. यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन जरूर घ्यावे किंवा आत्मविश्वासपूर्वक अचूकपणे पुढील प्राणायाम करावा.

प्रथमत: डाव्या नाकपुडीने पाच सेकंद पूरक करावा. नंतर दहा सेकंद आंतरकुंभक व त्यानंतर दहा सेकंद उजव्या नाकपुडीतून रेचक करावा. त्यानंतर उजव्या नाकपुडीतून पाच सेकंद पूरक दहा सेकंद आंतरकुंभक व नंतर डाव्या नाकपूडीतून दहा सेकंद रेचक करावा. अशा उलटसुलट प्रकारांची काही दिवस सवय करून घ्यावी. हा क्रम सामान्यात: आठ–दहा दिवस चालावा. दीर्घश्वसनानंतर दररोज सकाळी व संध्याकाळी या प्रकारचे प्राणायाम दहा दहा वेळ तरी करावेत.

नंतर पाच सेकंद डाव्या नाकपुडीने पूरक, पंधरा सेकंद आंतरकुंभक व दहा सेकंद उजवीने रेचक नंतर लगेचच उजव्या नाकपुडीने पाच सेकंद पूरक, पंधरा सेकंद आंतरकुंभक व दहा सेकंद डाव्या नाकपुडीने रेचक ही सवय करून घ्यावी. हा सरावही आठ दहा दिवस चालवावा. दीर्घश्वसनानंतर सकाळी दहा वेळा व संध्याकाळी दहा वेळा असा हा सराव करावा.

पुढे पाच सेकंद डाव्या नाकपुडीने पूरक, वीस सेकंद आंतरकुंभक व दहा सेकंद उजव्या नाकपुडीतून रेचक, लगेच पुन्हा पाच सेकंद उजव्या नाकपुडीने पूरक वीस सेकंद आंतरकुंभक व दहा सेकंद डाव्या नाकपुडीतून रेचक असा प्राणायाम करावा. दररोज सकाळी व संध्याकाळी प्रारंभी दीर्घश्वसन क्रिया पंचवीस ते पन्नास वेळा केल्यानंतर हा

प्राणायाम दहा दहा वेळा करावा व याचा सराव एक महिन्यापर्यंत करावा. याप्रमाणे दररोज दीर्घश्वसन व प्राणायाम झाल्यानंतर ध्यानास बसावे. या स्थितीत मन, बुध्दी, शरीराचे निरीक्षण करावे. आपल्यात काय फरक झाला आहे त्याकडे लक्ष द्यावे. यामुळे सुषुम्ना नाडी चालू होईल. सुषुम्ना नाडी चालू होणे म्हणजे दोन्ही नाकपुड्यातून सारख्याच प्रमाणात श्वासोच्छवास सुरु होणे. असे झाल्यावर आपल्या शरीराची व मनाची शुध्दी वाढत राहते. हळू हळू प्राणायामाशिवाय सुषुम्ना नाडी अधिक चालू राहते व ध्यानाला बसण्यास आनंद वाटतो. प्राणायामाने हीच गोष्ट साध्य करून घ्यावयाची असते. योगी व संन्यासी हीच संधी साधत असतो.

ध्यान्याच्या वेळी जेव्हा सुषुम्ना नाडी चालू राहते तेव्हा श्वासोश्वासात सहजता येते. शरीरातील आनंदवृत्ति वाढते. हा क्षण म्हणजे आध्यात्मिक मार्गातील एक संधी आहे. या क्षणाला उद्देशून ज्ञानेश्वर माऊलीने म्हटले आहे.

देवाचिये द्वारी उभा क्षणभरी ।।
तेणे मुक्ती चारी साधियेल्या ।।

ध्यानातील असल्या एका क्षणाने चारही प्रकारच्या मुक्ती मिळतात. आध्यात्मिक मार्गातील ही संधी साधून मनात असा भाव निर्माण करा की, 'माझ्या दोन्ही भुवयांच्यामध्ये नारायण आहे आणि आपण जो श्वास शरीरात घेतो, तो विश्वातून परमात्म्याकडून शक्ति घेऊन येत आहे. ती शक्ती प्रथमत: नारायणाकडे येते आहे. व तिथून हृदयात असणाऱ्या लक्ष्मीकडे

जाते आहे. लक्ष्मी अर्थात लक्ष+मी म्हणजेच 'मी' वर लक्ष्य ठेव. नारायणाकडून येणाऱ्या श्वासाला म्हणजेच परमात्म शक्तीला हृदयातील 'मी' ची भेट घ्यावयाची आहे. आणि ही भेट प्रत्येक श्वासाला दर्शनरूपाने होते. आत्मा हा मनाच्या देहरूपी पिंजऱ्यात आहे. पण मनास आत्म्याची ओळख नाही. त्याच्या ओळखीचा एकच मार्ग आहे तो म्हणजे श्वास होय. पण मन हे देहाच्या सुखाकरितां अनेक जन्म वाया घालविते. मनाला आत्म्याची ओळख होण्याकरीतां मनाने श्वासाबरोबर असा संकल्प करावा की, श्वास आत घेतांना विश्वातील अमृतमयी शक्ती माझ्या देहात येत आहे. आणि श्वास बाहेर सोडतांना शारीरिक व मानसिक विकार बाहेर पडत आहेत. अशा संकल्पामुळे मनाने आत्म्यावर केलेले अनेक जन्माचे आवरण नाहीसे होऊन मनाला आत्म्याची ओळख होईल. मनाने आत्म्याची ओळख करून घेतल्यानंतरच परमात्म भेटीची शक्ती लाभेल. अशा प्रकारे ही परमात्मरूपी आई आपल्या या आत्मरूपी मुलास भेटण्यास दररोज २१६०० वेळा येऊन जाते. कारण आई व मुलाची ताटातूट करण्यास मन पटाईत आहे. ही भेट झाली तर मनाचा देहाविषयीचा खेळ नाहीसा होतो. मन अनेक जन्म आपल्याबरोबर येत आहे. प्रत्येक जन्मात ते या परमात्मरूपी आत्मपिंडावर वासनेचे पांघरूण घालते व देहाकडून आणि इंद्रियाकडून सुख भोगते आहे. सुखाला लालचावलेले हे मन परमात्म माऊलीला मुलाची भेट घेऊच देत नाही. ध्यानाची साधना करणाऱ्या प्रत्येक साधकाने प्राणायामाच्या वेळा सुषुम्ना नाडी सुरु होताच वरील भावस्थितीत जाण्याचा प्रयत्न करावा. हा प्रयत्न म्हणजे मोक्ष मंदिराचे दार उघडणे होय.

वरील प्राणायाम हा दोन प्रकारचा आहे. १) सगर्भ प्राणायाम, २) अगर्भ प्राणायाम. सगर्भ प्राणायाम म्हणजे मंत्रयुक्त प्राणायाम होय. अगर्भ प्राणायाम म्हणजे मंत्र रहित प्राणायाम होय.

साधकाने प्रथम कांही दिवस अगर्भ प्राणायाम करावा. कारण मंत्रसहित प्राणायाम करतांना तो अंकात बसतो कां? शरीराला पेलतो कां? इकडे अवधान गेल्यामुळे आपण गडबडून जातो. गोंधळतो व प्राणायाम बरोबर आला की नाही याविषयी शंका निर्माण होते. म्हणून मंत्ररहित प्राणायाम कांही दिवस करावा आणि त्याचा सराव झाला की मंत्रसहित प्राणायाम करावा या प्राणायामाचे पुढीलप्रमाणे आठ भेद आहेत.

१) सुर्यभेदन, २) उज्जायी, ३) सीत्कारी, ४) शीतली, ५) भस्त्रिका, ६) भ्रामरी, ७) मूर्च्छा, ८) प्लाविनी.

१) सूर्यभेदन :-

सिध्दासन किंवा वज्रासन किंवा पद्मासनात बसावे. डावी नाकपुडी हाताच्या दोन्ही बोटांनी बंद करावी. उजव्या नाकपुडीने सावकाश श्वास घेऊन जमेल तितका वेळ अंतरकुंभक करावा. डाव्या नाकपुडीने सावकाश श्वास सोडावा. अशाप्रकारे आंतरकुंभकासह हा प्राणायाम आठ दहा वेळा करावा. नंतर कुंभकरहित एकास दोन या प्रमाणाने पूरक व रेचक करीत प्राणायाम आठ दहा वेळा करावा यावेळी उजवीने पूरक व डावीने रेचक करावा.

ब्लडप्रेशर, हृदयविकार असणाऱ्या व्यक्तींनी कुंभरहित कोणताही प्राणायाम करावा. हा सुर्यभेदन प्राणायाम उष्ण आहे. दमा असणाऱ्या व्यक्तींना त्याचा अधिक फायदा होतो. यामुळे शरीरातील दूषित वायुचा नाश होतो.

२) उज्जायी :-

सुखासन किंवा सिध्दासनात बसून तोंड बंद करून नाकाने सावकाशपणे पूर्ण श्वास घ्यावा व यथाशक्ति कुंभक करावा. नंतर उजवी नाकपुडी बोटांनी बंद करून डाव्या नाकपुडीने सावकाश रेचक करावा. असे आठदहा वेळा दोन्ही नाकपुड्यांनी

पूरक करून डावीने रेचक करावा. या प्राणायामाने केवलकुंभक साधला जातो. हा प्राणायाम उष्ण असल्यामुळे कफ, वात इ. विकार नाहीसे होतात. हृदय व कंठाचे दोष नाहीसे होतात.

३) सीत्कारी :-

पद्मासनाने बसावे. जीभ दातांच्यामध्ये थोडी बाहेर पण ओठाच्या आत ठेवून तोंडाने सीऽऽ असा एकसारखा आवाज करीत तोंडानेच हवा आत घ्यावी. नंतर जमेल तेवढा वेळ आंतरकुंभक अवस्थेत थांबून मगच नाकाने रेचक करावा. असे चार पाच वेळा करावे. या प्राणायामाने आळस नाहीसा होऊन उत्साह वाढतो. उष्णता कमी होते.

४) शीतली :-

जीभेची पन्हाळीसारखा आकार करून ती ओठाच्या थोडी बाहेर काढून तोंडाने सावकाश पूरक करावा. यथाशक्ती आंतरकुंभक करून दोन्ही नाकपुड्यांनी सहज रेचक करावा. असे चारपाच वेळा करावे. पूरक करीत असतांना ओलसर जीभेवरून येणारी हवा थंड होऊन येते व फुफ्फुसात जाते. यामुळे थंडावा निर्माण होतो. शरीरातील उष्णता कमी होते.

५) भस्त्रिका :-

भस्त्रिका म्हणजे भाता, लोहाराच्या भात्याप्रमाणे हवा घेणे व सोडणे या कृतीला भस्त्रिका प्राणायाम म्हणतात.

पद्मासन, वज्रासन, वा सिध्दासन घालून बसावे. प्रथम पुरक करीत हवा आत घेतो तसे पोट फुगवावे. रेचक करतांना पोट आत ओढून घ्यावे. पूरक व रेचक यांची गती समान असावी. याचा वेग नियमित श्वासोच्छवासाच्या गतीपेक्षा कमी असावा. यामध्ये हवा पूर्ण घेऊन सोडली जाते.

या प्राणायामचा दुसरा प्रकार असा की, डाव्या नाकपुडीने हवा जलद रीतीने आत घ्यावयाची व उजव्या नाकपुडीतून जलद सोडावयाची. पुन्हा उजवीने जलद आत घेऊन डावीने सोडावयाची. असे एकाच प्रयत्नात आठ-दहा वेळा करावे. थोडे थांबून पुन्हा एक हप्ता करावा. यामुळे चक्कर आल्यासारखे होते. त्यादृष्टीने आपले प्रमाण आपण ठरवावे.

६) भ्रामरी :-

भ्रामरी म्हणजे भ्रमराप्रमाणे गुंजारवसहित आवाज करणे. प्रथम दोन्हीही नाकपुडीने पूरक करून भुंग्यासारखा आवाज करीत दोन्ही नाकपुड्यातून रेचक करावा. म्हणजे हृदयापासून रंध्रापर्यंत स्पंदनाच्या लहरी निर्माण होतात आणि नादब्रह्माचा आनंद मिळतो.

७) मूर्च्छा :-

मूर्च्छा म्हणजे षण्मुखी मुद्रा. दोन्ही हाताच्या दोन्ही अंगठ्यांनी दोन्ही कानांची भोके बंद करावयाची. त्याचवेळी दोन्ही तर्जन्यांनी दोन्ही डोळे बंद करून घ्यावयाचे. दोन्ही

मध्यमा दोन्ही नाकपुड्यांवर दोन्ही अनामिका वरच्या ओठावर व दोन्ही कनिष्ठिका खालच्या ओठावर ठेवून डाव्या नाकपुडीवरील बोट काढून पूरक करावा. पूरकाच्या शेवटी जालंधरबंध करून कुंभक करावा. यामुळे मन मूर्च्छित होते. नाद व प्रकाशाची जाणीव होते.

८) प्लाविनी :-

पद्मासन घालून मत्स्यासन करावे. पूरक करून पोट फुगवून कुंभक अवस्थेत थांबावे. कांही दिवस या मुद्रेचा जमिनीवर सराव केल्यानंतर ज्यांना पोहता येते. त्यांनी पाण्यावर प्लाविनीमुद्रेचा अभ्यास करावा. म्हणजे पाण्यावर कमलपत्राप्रमाणे राहता येईल. सर्व कुंभक प्रकारामुळे शरीरातील दूषित वायू नाहिसा होऊन शरीर मन स्वच्छ होण्यास मदत होते.

प्रात:स्मरण प्रार्थना

१) गणेश वंदन :-

वक्रतुण्ड महाकाय सुर्यकोटिसमप्रभ।।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा।।
गणनाथसरस्वती रवि शुक्र बृहस्पतीन।
पंचैतान् संस्मरणेन् नित्यं वेदवाणी प्रवृत्तये।।
विनायकं गुरुं भानु ब्रह्मा विष्णु महेश्वरान्।
सरस्वतीं प्रणम्यादौ सर्वकार्यार्थ सिध्दयै।।
अभीप्सितार्थ सिध्दयर्थं पूजितो यः सुरासुरैः।।
सर्वविघ्नहरस्तस्मै गणाधिपतये नमः।।

२) पुण्यश्लोक नृपतींना वंदन :-

पुण्यश्लोको नलो राजा, पुण्यश्लोको युधिष्ठिरः।।
पुण्यश्लोको विदेहश्च पुण्यश्लोको जनार्दनः।।
अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च बिभीषणः।।
कृप परशुरामाश्च सप्तैते चिरंजीविनः।।
बलिर्बिभीषणो भीष्मः प्रल्हादो नारदो ध्रूवः।।
षडैते वैष्णवास्तेषां स्मरणं पापनाशनम्।।

३) पंचमहासती :-

अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मन्दोदरी स्तथा।।
पंच कन्यां स्मरेन्नित्यं महापातक नाशनम्।।

४) सप्त मोक्षदायिनी पुरी :-

अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवन्तिका,।।
पुरी, द्वारावती, चैव सप्तैता मोक्षदायिका:।।

५) नवग्रहस्मरण :-

ब्रह्मा मुरांरिस्त्रिपुरान्तकारिर्भानु: शशी भूमिसुतो बुधश्च।
गुरुश्च शुक: शनि राहु केतव:
कुर्वन्तु सर्वे मम सुप्रभातम्।।

६) श्रीरामस्मरण :-

आदौ रामतपोवनादिगमनं हत्वा मृगं कांचनम्।
वैदेहीहरणं जटायुमरणं सुग्रीवं संभाषणम्।।
वालीनिर्दलनं समुद्रतरणं लंकापुरी दाहनम्।
पश्चाद्रावणकुंभकर्ण हननमेतध्दि रामायणम्।।
श्रीरामा पुरुषोत्तमा नरहरे नारायणा केशवा।
गोविंदा गरुडध्वजा गुणनिधेदामोदरा माधवा।।
श्रीकृष्णा कमलापते यदुपते सीतापते श्रीपते।
वैकुण्डधिपते चराचरपते लक्ष्मीपते पाहि माम्।।

७) श्रीकृष्ण स्मरणं :-

आदौदेवकीदेवी गर्भजननं गोपीगृहे वर्धनम्।
मायापूतनजीविताप हरणं गोवर्धनोध्दारणम्।।
कंसच्छेदन कौरवादिहननं कुन्ती तनूजावनम्।

एतम्दागवतं पुराणकथितं श्रीकृष्णलीलामृतम्।।
उत्तिष्ठोत्तिष्ठं गोविंद उत्तिष्ठ गरूडध्वज।
उत्तिष्ठ कमलाकान्तं त्रैलोक्यं मंगलं कुरु।।
नमो ब्रह्मण्यदेवाय गोब्राह्मणहिताय च।
जगध्दिताय कृष्णाय गोविंन्दाय नमो नमः।।
कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने।
प्रणतक्लेशनाशाय गोविन्दाय नमो नमः।।

८) नामस्मरण :-

कर्कोटकस्य नागस्य दमयन्त्या नलस्य च।
ऋतुपर्णस्य राजर्षेः कीर्तनं कलिनाशनम्।।
अनन्तं वासुकिंशेषं पद्मनाभंच कम्बलम्।
शंखपालं धृतराष्ट्रंच तक्षकं कालियं तथा।।
(या श्लोकाचे स्मरण केल्याने सर्पविषभय निवारण होते व सर्वत्र विजय प्राप्त होतो सर्प अथवा नागाचे स्वप्न निवारण होते व तो सुखी होतो.)

८अ) श्री धन्वन्तरी स्तवन :-

शंङ्खं चक्रं जलौकां दधतममृतघटं चारूदोर्भिश्चतुर्भिः
सूक्ष्मस्च्छातिहृद्यांशकुपरि विलसन् मौलिभौजनेत्रम् ।।
कालाम्मोदाज्वलाङ्ग कटितटि विलसच्चारूपीताम्बराढ्यम्।
वन्दे धन्वन्तरीम् तम् निखिलगदवन् प्रौढदावाग्निलीम्।।

९) द्वादशज्योतिर्लिंग स्मरण :-

सौराष्ट्रे सोमनाथंच श्रीशैले मल्लिकार्जुनम्।
उज्जयिन्यां महाकालओंकार ममलेश्वरम्।।
परल्यां वैजनाथंच डाकिन्यां भीमशंकरम्।
सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारूकावने।।
वाराणस्यां तु विश्वेशः त्र्यंबकं गौतमीतटे।
हिमालये तुकेदारं घृष्णेशं शिवालये।।
एतानि ज्योतिर्लिंगानि सायं प्रातः पठेन्नरः।
सप्तजन्मकृतं पापं स्मरणे न विनश्यति।।

१०) श्रीगोविंद स्मरण :-

भज गोविन्दं भज गोविन्दं, भज गोविंदं मूढमते।।
प्राप्ते संनिहिते मरणे, नहिनहि रक्षति डुकृय्करणे।
अंगं गलितं पलितं मुण्डं, दशनविहीनं, जातं तुण्डम्।।
वृध्दो याति गृहीत्वा दण्डं, तदपि न मुंचत्याशापिण्डम्।
पुनरपिजननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरेशयनम्।
इह संसारे खलु दुस्तारे कृपयाऽपारे पाहि मुरारे।।
पुनरपि रजनी पुनरपि दिवसः पुनरपि पक्षपुनरपि मासः।
पुनरप्ययनं पुनरपि वर्षं तदपि न मुंचत्याशामर्षम्।।
गेयं गीतानाम सहस्त्रं ध्येयं श्रीपतिरूपमजस्त्र
नेयं सज्जनसंगे चित्तं देयं दीनजनायच वित्तम्।
कुरुते गंगासागर गमनं व्रतपरिपालनमथवा दानम्।
ज्ञानविहीने सर्वमतेन मुक्तिर्न भवति जन्मशतेन।।

११) शान्तिपाठ :-

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयामदेवः भद्रंपश्येमाक्षभिर्यजत्राः।
स्थिरैरंगैतुष्ट वांसस्तनूभिः व्यशेम देवहितं यदायु।।
स्वस्तिन इन्द्रो वृध्दश्रवाः स्वस्तिनः पूषा विश्ववेदाः।
स्वस्तिनस्ताक्ष्यों अरिष्टनेमिः स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु।।

देव-देवतांची ध्याने

१) श्रीगणपती ध्यान :-

वक्रतुण्डं महाकाय सुर्यकोटि समप्रभ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा।।

२) श्रीदेवी ध्यान :-

नमोदेव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः।
नमः प्रकृत्ये भद्रायै नियताः प्रणताः स्मताम्।।

३) श्री गुरुचे ध्यान :-

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात्परब्रह्मतस्मै श्रीगुरवे नमः।।

४) श्री दत्तात्रेय ध्यान :-

काषायवस्त्रं करदंडधारिणं कमंडलुं पद्मकरेण शंखम्।
चक्रं गदाभूषित भूषणाढयं श्रीपादराजं शरणं प्रपद्ये।।

५) श्री मारूती ध्यान :-

मनोजवं मारूततुल्यवेगं जितेन्द्रिय बुध्दिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथ मुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।

६) श्री सूर्य ध्यान :-

ध्येयः सदा सवितृमंडल मध्यवर्ती।
नारायणः सरसिजासनन्निविष्ट।।
केयूरवान् मकरकुंडलवान् किरीटी।
हारी हिरण्ययवपुर्धृत शंखचक्रः।।

७) श्री सद्‌गुरु ध्यान :-

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलंज्ञानमूर्तिम्।
द्वन्द्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम्।।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षिभूतं।
भावातीतंत्रिगुणरहितं सद्‌गुरुं तं नमामि।।

८) श्री सरस्वती ध्यान :-

सरस्वती नमस्तुभ्यं वरदे कामरूपिणी।
विद्यारंभं करिष्यामि सिध्दिर्भवतु मे सदा।।
या कुन्देन्दु तुषारहारधवला या शुभ्रसवस्त्रावृत्ता।।
या वीणावरदण्डमंडित करा या श्वेतपद्मासना।।
या ब्रह्माऽच्युतशंकर प्रभृतिभिर्देवैः सदा वंदिता।।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यावहा।।

९) श्री गायत्री ध्यान :-

मुक्ताविद्रुमहेमनीलधवलच्छायैमुखैः स्त्रीक्षणैः।
युक्तामिन्दु निबध्दरत्नमुकुटा तत्वार्थवर्णात्मिकां।।
गायत्रीं वरदाभयां कुशकशां शुभ्रं कपालं गुणं।
शंखंचक्रमथारविंद युगुलं हस्तैर्वहन्तिं भजे।।

१०) श्रीशान्तादुर्गा ध्यान :-

कर्णस्वर्णविलोल कुण्डलश्च रामपीनरूक्षोरूहां।
मुक्ताहार विभूषणा परिलसध्दम्मील सन्मालिकाम्।।
लीलालोचन लोचनाशशिमुखी माबध्दकांची सृजां।
दिव्यंती भुवनेश्वरी मनुदिनं शांताख्यदुर्गां भजेत्।।

११) श्रीदेवी ध्यान :-

अमलकमलसंस्था तद्रजःपूंजवर्ण।
करकमलधृतेष्वा भीति युग्माब्मुजाच।।
मणिकटकविचित्रालंकृता कल्पजालः।
सकलभुवनमाता सततंश्री श्रियं नः।।
मायाकुण्डलिनी क्रियामधुमति कालिकलामालिनी।
मांतगी विजया जया भगवतिदेवी शिवाशाम्भवी।।
शक्तिशंकरवल्लभा त्रिनयना वाग्वाहिनी भैरवी।
ॐ कारी त्रिपुरासुरासुरमयी माता कुमारीश्वरी।।

१२) श्री शिव ध्यान :-

ध्यायेन्नित्यं महेशं रजतगिरिनिभं चारुचन्द्रावतंसं।
रत्नाकल्पोज्वलांग परशुमृगधराभीतिहस्तं प्रसन्नम्।।
पद्मासीनं समंतात स्तुतमम गणैर्व्याघ्रप्रकृति वसानं।
विश्वाद्यं विश्ववंद्य निखिलभयहरं पंचवक्त्रं त्रिनेत्रम्।।
वन्दे देव उमापतिसुरगुरु वन्दे जगत्कारणम्।
वन्दे पन्नगभूषणं मृगधरं वन्दे पशूनां पतिम्।।
वन्दे सूर्यशशांक वन्हिनयनं वन्दे मुकुन्दप्रियम।
वन्दे भक्तजनाश्रयंच वरदं वन्दे शिवंशंकरम्।।

१३) श्री विष्णु ध्यान :-

श्रीवत्सं मणिकौस्तुभंच मुकुटं केयूरमुद्रांकितं।
बिभ्राणं वरदं चतुर्भुजधरं पितांबरोभ्दासितम्।।
मेघश्यामतनुं प्रसन्नवदनं फुल्लारविन्देक्षणं।
ध्यायेद्व्यंकटनायकं हृदि रमाधीशं सुरैर्वन्दितम्।।
शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं।
विश्वाधारं गगनसदृश्यं मेघवर्णं शुभांगम्।।
लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं।
वन्दे विष्णु भवभयहरः सर्व लोकैकनाथम्।।

१४) श्री व्यासध्यान :-

नमोऽस्तुते व्यास विशालबुध्दे फुल्लारविन्दायतपत्रनेथ।
येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः।।

१५) श्रीकृष्ण ध्यान :-

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम्।
देवकी परमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम्।।
प्रपन्नपारिजाताय तोत्रवेत्रैकपाणये।
ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः।।
सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालन्दनः।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतंमहत्।।

१६) श्रीराम ध्यान :-

योगीन्द्रसंघैश्च सुसेव्यमानं नारायणं निर्मलमादिदेवम्
नतोऽस्मि नित्यं जगदेकनाथमादित्यवर्णं तमसः परस्तात्।।
विभूतिदं विश्वसृजं विरामं राजेन्द्रमीशं रघुवंशनाथं।
अचिनत्यमव्यक्तमनन्तमूर्तिं ज्योतिर्मयं राममहंभजामि।।
ध्यायेदाजानुबाहुं धृतशरं धनुषं बध्दपद्मासनस्थं।
पीतं वासो वसानं नवकमलदलस्पर्धिनेत्रं प्रसन्नम्।
वामांकारूढ सीतामुखकमल मिलल्लोचनं नीरदाभं।
नानालंकार दीप्तं दधतमुरु जटा मंडलं रामचन्द्रम्।।

१७) श्री आद्यनारायण ध्यान :-

यं ब्रह्मा वरूणेन्द्ररूद्रमरूतस्तुन्वन्तु दिव्यैस्तवैः।
वेदै सांगपदक्रमोपनिषदैर्गायंति यं सामगाः।।
ध्यानावस्तितद्गतेन मनसा पश्यंति यं योगिनः।
यस्यान्तंन विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः।।

१८) श्री सच्चिदानन्द ब्रह्म 'सत्' ध्यान :-

जन्माद्यस्य यतोऽन्वयादि तरतश्चार्थेष्वभिज्ञः स्वराट्।
तेनेब्रह्महृदाय आदिकवये मुह्यन्ति यत्सूरयः।।
तेजो वारिमृदां यथा विनिमयो यत्रत्रिसर्गोमृषा।
धाम्नां स्वेनसदा निरस्तकुहकंसत्यं परं धीमहि।।
यस्मात्सर्वमिदं प्रपंचरचितं माया जगज्जायते।
यस्मिंस्तिष्ठाति याति चान्तसमये कल्पानुकल्पे पुनः।।
यं ध्यात्वा मुनयः प्रपञ्चरहितं विन्दन्ति मोक्षं ध्रुवं।

तं वन्दे पुरुषोत्तमाख्यममलं नित्यं विभुं निश्चलम्।।
स वृक्षकालाकृतिभिः परोऽन्यो यस्मात्प्रपञ्च परिवर्ततेऽयं।
धर्मावहं पापनुदं भगेशं ज्ञात्वात्मस्थममृतं विश्वधाम।।
स तन्मयोह्यमृत ईशसंस्थो ज्ञं सर्वगो भुवनस्यास्य गोप्ता।
य इशे अस्यजगतो नित्यमेव नान्यो हेतुर्विद्यते ईशनाय।।

१९) श्री गुरु प्रणामाष्टक :-

ॐ अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानाञ्जनशलाकया।
चक्षुरून्मिलितं येन तस्मै श्री गुरवे नमः।।
अखंड मंडलाकारं व्याप्तं येन चराचरम्।
तत्पददर्शितं येन तस्मै श्री गुरवे नमः।।
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णूः गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुर्साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।।
सर्वश्रुतिशिरोरत्न विराजित पदाम्बुजः।
